ePaper
अजित पवार यांचा थेट हल्ला; शरद पवारांनी आम्हाला गाफील ठेवले!



| वर्ष - 7 । अंक - 204 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- टीम इंडियाने बदला घेतला!
- 'सालार'चा ट्रेलर आऊट
- शाळांत बॉम्ब ठेवल्याची धमकी
- २४ डिसेंबरपर्यंत मराठा आरक्षण द्यावं!

www.mahaenews.com । शनिवार, दिनांक 2 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ‘एसटीपी’साठी सोसायटीधारक ‘वेठीस’ !

## नळ कनेक्शन तोडण्याची नोटीस : सोसायटी फेडरेशनचा प्रशासनाला विरोध

।पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरीचिंचवड महापालिका प्रशासनाकडून शहरातील ४१ सहकारी गृह रचना संस्थांना त्यांचे STP ( मैला शुद्धीकरण आणि पाणी पुनर्वापर प्रकल्प ) बंद असल्याने सोसायटीचे पाण्याचे नळ कनेक्शन तोडण्याच्या एकतर्फी निर्णयाची अंमलबजावणी करू नये, अशी मागणी सोसायटीधारकांनी केली आहे.**






याबाबत चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनने महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त-2 यांनी वर्तमानपत्रांमध्ये दिलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार तसेच शहरातील ४१ सहकारी गृहरचना संस्थांना दिलेल्या नोटिसीनुसार या ४१ सहकारी गृह रचना संस्थांचे मैला शुद्धीकरण आणि पाणी पुनर्वापर केंद्र ( STP) बंद असल्याने सदरील सोसायट्यांचे पाण्याचे नळ कनेक्शन कट करण्याबाबत सुचवलेले आहे. आपला हा निर्णय एकतर्फी आहे.

संबंधित ४१ सोसायट्यांच्या बांधकाम व्यवसायिकांनी सदर गृहप्रकल्पामध्ये बसवलेले एस.टी.पी. अतिशय निकृष्ट दर्जाचे आहेत. तसेच विकसकाकडून सोसायटी हस्तांतरण करत असताना सदरील एसटीपी ह्या चालू अवस्थेत नव्हत्या. फक्त याच ४१ सोसायट्यांच्या नव्हे, तर पिंपरी-चिंचवड शहरातील बऱ्याच सोसायट्यांमधील एसटीपी विकसकाकडून सोसायटी हस्तांतरण करत असताना बंद असतात त्या चालू अवस्थेत नसतात, तरी त्या आमच्या सोसायटीधारकांच्या माथी मारल्या जातात. शहरातील ९० टक्के गृहप्रकल्पामध्ये एसटीपी प्रकल्प कार्यान्वित नसताना देखील आपल्या बांधकाम विभागाकडून पार्ट कंम्प्लिशन , (भाग पूर्णत्वाचा दाखला) दिला जातो. याबाबत आमच्या फेडरेशन मार्फत आपणाला वेळोवेळी लिखित तक्रारी देखील केलेल्या आहेत या सर्व गोष्टी आपल्या निदर्शनास आणून दिलेले आहेत. तरी पण आपण शहरातील बांधकाम व्यवसायिकांना पाठीशी घालत यावर कोणतीही ॲक्शन घेतलेली नाही, असा दावा फेडरेशनने केला आहे.

### बैठकीतील निर्णयांवर अंमलबजावणी नाही...

» आयुक्तांच्या दालनात 30 ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीमधील चर्चेनुसार आमच्या फेडरेशन कडून दिनांक 31 ऑगस्ट 2023 रोजी जावक क्र.241/ 23 हे पत्र दिले होते आणि या पत्रामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील 30 बांधकाम व्यवसायिकांच्या अनियमित, चुकीच्या कामाबद्दल तसेच निकृष्ट दर्जाच्या एसटीपी बसलेल्या असल्या बद्दल तक्रार केली होती यावर देखील आपण आजपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. तसेच आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला बांधकाम व्यवसायिकांनी जोपर्यंत भामा आसखेडचा टप्पा क्रमांक पाच आणि सहा पूर्ण होत नाही तोपर्यंत हे बांधकाम व्यवसायिक स्वखर्चाने पाणी पुरवतील अशा लिहून दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन केल्यामुळे भारतीय दंड संहिता कलम 200 प्रमाणे यांच्यावर देखील कारवाई करण्याची तक्रार आम्ही केली होती. परंतु यावर देखील आपल्याकडून कोणतीही कारवाई झालेली नाही.



“ पिंपरी-चिंचवड शहरातील बरेच बांधकाम व्यवसायिक त्यांच्या गृहप्रकल्पामध्ये बसवत आलेल्या एस.टी.पी यंत्रणा या अतिशय निकृष्ट दर्जाच्या असतात. UDCPR मधे अट आहे ,एक नियम आहे म्हणून फॉर्मलिटी म्हणून त्या बसवल्या जातात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून याची कोणत्याही प्रकारची तपासणी न करता सदर गृहप्रकल्पांना बांधकाम पूर्णत्वाचे दाखले दिले जातात. मनपाच्या पर्यावरण विभागाकडून सोसायट्यांमधील या एसटीपी यंत्रणेबाबत कोणतीही पाहणी न करता विकसकांना ना हरकत दाखला( NOC ) दिल्या जातात या सर्वांबाबत मनपाच्या माननीय आयुक्तांना आमच्या फेडरेशन मार्फत वारंवार लिखित तक्रारी करून देखील आयुक्तांकडून अधिकाऱ्यांना आणि बांधकाम व्यवसायिकांना पाठीशी घेतली जाते. जोपर्यंत वरील या सर्वांवर कारवाई होत नाही. तोपर्यंत आम्ही कोणत्याही सोसायटीमधील पाण्याचे नळ कनेक्शन कट करू देणार नाही.

**–संजीवन सांगळे,**
अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

# शाळांच्या गुणवत्ता वाढीची जबाबदारी शिक्षकांनी स्वीकारावी!

## जल्लोष शिक्षणाचा पर्व-2 चे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते उद्घाटन!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शाळांच्या गुणवत्ता वाढीची जबाबदारी स्वीकारण्याची मानसिकता त्या शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि पालक समितीमध्ये निर्माण झाली पाहिजे, त्यातूनच शाळांचा दर्जा वाढण्यासोबतच मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल आणि हाच खऱ्या अर्थाने शिक्षणाचा जल्लोष साजरा करण्याचा दिवस असेल, असे प्रतिपादन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधील स्पर्धात्मक, गुणात्मक तसेच नाविन्यपूर्ण विचार वाढीकरिता “जल्लोष शिक्षणाचा २०२३-२४” या स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते निगडी येथील ग दि माडगूळकर सभागृह येथे करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संजय नाईकडे, आकांक्षा फाउंडेशनच्या जयश्री ओबेरॉय तसेच मुख्यध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. भारत दर्शन हा विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी महत्वपूर्ण उपक्रम आहे.

# यंदा कडाक्याची थंडी नाहीच?

## » डिसेंबरही सरासरीपेक्षा उष्ण राहणार : हवामान विभाग

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**यंदाच्या हिवाळ्यात कडाक्याच्या थंडीची किंवा थंडीच्या लाटांची शक्यता कमी आहे. कडाक्याची थंडी पडलीच तर ती कमी काळासाठी असेल. शिवाय डिसेंबर महिन्यात कमाल, किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील, असा अंदाज हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी व्यक्त केला आहे.**



शुक्रवारी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. महापात्रा म्हणाले, यंदाच्या हिवाळ्यात डिसेंबर ते फेब्रुवारी या काळात कडाक्याची थंडी पडण्याची किंवा थंड लाटांची शक्यता कमी आहे. कडाक्याची थंडी पडलीच तर ती, कमी काळासाठी असेल. डिसेंबर महिन्यात कमाल, किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील. महाराष्ट्रातही किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे.

यंदाचा नोव्हेंबर महिनाही सरासरीपेक्षा उष्ण ठरला आहे. डिसेंबर महिनाही सरासरीपेक्षा उष्ण राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्राचे सोमवारी, तीन डिसेंबर रोजी चक्रीवादळात रुपांतर होण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ ताशी ८० ते १०० किलोमीटर वेगाने तमिळनाडू आणि आंध्र प्रदेशाच्या किनाऱ्याकडे झेपावेल. त्यामुळे तमिळनाडू आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे. या चक्रीवादळाचा फारसा परिणाम महाराष्ट्रावर होण्याची शक्यता नाही. विदर्भ आणि मराठवाड्यात हवामान ढगाळ राहण्याची आणि हवेत आद्रतेचे प्रमाण वाढण्याचा अंदाज आहे. यंदाचे वर्ष हवामान शास्त्राच्या १७४ वर्षांच्या इतिहासात सर्वाधिक उष्ण ठरण्याचा अंदाज आहे. १८५० ते १९०० या काळातील सरासरी तापमानाच्या तुलनेत यंदा जागतिक तापमानात सुमारे १.४० अंशाने वाढ झाली आहे. त्यामुळे यंदाचे वर्ष आजवरचे सर्वात उष्ण वर्ष ठरणार आहे. पण, आम्ही डिसेंबर महिन्यातील जागतिक तापमानाच्या नोंदींवर लक्ष ठेवून आहोत, असेही महापात्रा म्हणाले. दरम्यान, यंदा जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिनेही सरासरीपेक्षा उष्ण ठरले आहेत. प्रशांत महासागरात सक्रिय असणाऱ्या एल-निनो या हवामान विषयक प्रणालीने जगात हाहाकार माजविला आहे. तापमान वाढ, दुष्काळ, अतिवृष्टी सारख्या नैसर्गिक आपत्तींचा सामना जगाला करावा लागत आहे. अन्नधान्य उत्पादनात होणाऱ्या संभाव्य घटीचा सामना कसा करायचा, असा प्रश्न जगाला भेडसावत आहे. ती एल-निनो प्रणाली डिसेंबरअखेर सक्रीय राहण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारी २०२४ नंतर एल-निनो निष्क्रीय होण्याची प्रक्रिया सुरू होईल. त्यामुळे २०२४च्या मोसमी पावसाच्या हंगामावर एल-निनोचा कोणताही परिणाम असणार नाही.

### एल-निनो निष्क्रिय होणार

» यंदाच्या हिवाळ्यात डिसेंबर ते फेब्रुवारी या काळात कडाक्याची थंडी पडण्याची किंवा थंड लाटांची शक्यता कमी आहे. कडाक्याची थंडी पडलीच तर ती, कमी काळासाठी असेल. डिसेंबर महिन्यात कमाल, किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील. महाराष्ट्रातही किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. यंदाचा नोव्हेंबर महिनाही सरासरीपेक्षा उष्ण ठरला आहे. डिसेंबर महिनाही सरासरीपेक्षा उष्ण राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्राचे सोमवारी, तीन डिसेंबर रोजी चक्रीवादळात रुपांतर होण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ ताशी ८० ते १०० किलोमीटर वेगाने तमिळनाडू आणि आंध्र प्रदेशाच्या किनाऱ्याकडे झेपावेल. त्यामुळे तमिळनाडू आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे. या चक्रीवादळाचा फारसा परिणाम महाराष्ट्रावर होण्याची शक्यता नाही.

# मुलांना मांसाहारी बनवण्याचं शासनाचं षड्यंत्र

## » शालेय पोषण आहारात अंडी नकोत : डॉ. कल्याण गंगवाल

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्र सरकारने ७ नोव्हेंबर २०२३ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध करत शाळेतील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात उकडलेली अंडी, अंडा भुर्जी, अंडा बिर्याणी, केळी देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. हा शासन निर्णय ५ डिसेंबर २०२३ पासून लागू केला जाणार आहे. "शास्त्रीयदृष्ट्या मांसाहार आरोग्यास हानिकारक असून, शालेय पोषण आहारात अंडी दिली जाऊ नयेत", अशी मागणी शाकाहार चळवळीचे पुरस्कर्ते डॉ. कल्याण गंगवाल यांनी पत्रकार परिषदेत केली.**

शाळांमधून जेवणात अंडी देणे अयोग्य आहे. शाळेतील जैन, महानुभव पंथी, ब्राह्मण व अन्य शाकाहारी विद्यार्थ्यांवर त्याचा परिणाम होईल. इतर विद्यार्थी अंड्यांचे पदार्थ खाताना त्यांनाही ते पदार्थ खाण्याची इच्छा होईल. वय लहान असल्याने त्यांना या गोष्टींचे ज्ञान नसते. त्यातून ही सवय जडली जाईल. एक प्रकारे या जैन आणि शाकाहारी मुलांना मांसाहारी बनविण्याचे महाराष्ट्र शासनाने षडयंत्र असून, ही अतिशय गंभीर बाब असल्याच त्यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की,अंडी उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ मिळण्यासाठी ही योजना चालू केली आहे.परंतु शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी विद्यार्थ्यांना मांसाहारी बनविणे कितपत योग्य आहे.याचा विचार आपण केला पाहिजे. आपला धर्म वाचविण्यासाठी सर्व लोकांनी एकत्र येऊन सरकारच्या



निर्णयाविरोधात तीव्र सामाजिक लढा देणे गरजेचे आहे.अंडे मांसाहारी असून, अंड्यातून कुठलेही पोषक घटक मिळत नाहीत. अंड्यात 'सी' व्हिटॅमिन नाही. प्रोटिन्सही केवळ १३.५ टक्के इतकेच आहे.त्यामध्ये कोलेस्ट्रॉल मोठ्या प्रमाणात असते. पोल्ट्री फार्ममधील कोंबड्यांवर ॲंटिबायोटिक्स, हार्मोन्सचा मोठा मारा होतो. शिवाय अंड्यांची उत्पत्ती अधिक व्हावी, याकरिता अनैसर्गिक प्रक्रिया केली जाते. अंडी शिळी की ताजी, याचीही आपल्याला माहिती नसते. त्यामुळे त्यातून अनेक रोगांना निमंत्रण मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की,अंड्याच्या सेवनामुळे सालमोनेला (टायफॉईडचा ताप), ॲलर्जी, सर्दी, दमा, त्वचारोग, फूड पॉइजनिंग, पचन प्रक्रियेत बिघाड आदी आजार बळावतात.अनेक घातक अंश शरीरात येत असल्याने हृदयविकार होण्याची शक्यता अधिक असते. अंडी शाकाहारी नाहीत.अफलित अंड्यातील जिवंत स्त्रीबीजाला आपण मारतो. अशा हिंसक आहारामुळे मानसिक आरोग्यही बिघडते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी आपण का खेळतोय, याचा विचार शाळा व पालकांनी करायला हवा,असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

### तीव्र सामाजिक लढा देणे गरजेचे

» अंडे मांसाहारी असून, अंड्यातून कुठलेही पोषक घटक मिळत नाहीत. अंड्यात 'सी' व्हिटॅमिन नाही. प्रोटिन्सही केवळ13.5 टक्के इतकेच आहे. त्यामध्ये कोलेस्ट्रॉल मोठ्या प्रमाणात असते. पोल्ट्री फार्ममधील कोंबड्यांवर ॲंटिबायोटिक्स, हार्मोन्सचा मोठा मारा होतो. शिवाय अंड्यांची उत्पत्ती अधिक व्हावी, याकरिता अनैसर्गिक प्रक्रिया केली जाते. अंडी शिळी की ताजी, याचीही आपल्याला माहिती नसते. त्यामुळे त्यातून अनेक रोगांना निमंत्रण मिळते," असेही डॉ. गंगवाल यांनी सांगितले. शासनाने निर्णयामध्ये असेही सांगितले आहे की, अंडी उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ मिळण्यासाठी ही योजना चालू केली आहे. परंतु शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी विद्यार्थ्यांना मांसाहारी बनविणे कितपत योग्य आहे, याचा विचार आपण केला पाहिजे. आपला धर्म वाचविण्यासाठी सर्व लोकांनी एकत्र येऊन सरकारच्या निर्णयाविरोधात तीव्र सामाजिक लढा देणे गरजेचे आहे."


राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
मध्यवर्ती कार्यालय
उदघाटन समारंभ
तसेच पदाधिकारी नियुक्ती सोहळा व कार्यकर्ता मेळावा
शनिवार दि 02/12/2023 रोजी संध्याकाळी 6:00 वाजता
स्थळ
सनशाईन मार्क्स बिल्डिंग ऑफिस बी/5,6,7 तळमजला, जुना मुंबई पुणे रोड,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी
पिंपरी,पुणे.411017
उदघाटक
श्री.जयंत पाटिल साहेब
प्रमुख उपस्थिती
सौ.सुप्रियाताई सुळे
(खासदार)
डॉ.अमोल कोल्हे
(खासदार)
श्री.राजेशभैया टोपे
(मा.आरोग्य मंत्री)
श्री.शशिकांत शिंदे
(मा. जलसंपदा मंत्री)
श्री.जितेंद्र आव्हाड
(मा. गृहनिर्माण मंत्री)
श्री.मेहबुब शेख
(युवक अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)
श्री.जयदेव गायकवाड
श्री.जावेद हाबिब
(अध्यक्ष अल्पसंख्यांक विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)
श्री.प्रकाश म्हस्के
(उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)
श्री.प्रशांत जगताप
(शहरअध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे)
शहराध्यक्ष
तुषार गजानन कामठे
पिंपरी चिंचवड शहर

# जीडीपी'चा दिलासा अन् चिंतेची लकेर




**देशाची अर्थव्यवस्था खूपच धडधाकट आहे; अनेक प्रतिष्ठित विश्लेषकांनी व्यक्त केलेल्या पूर्वानुमानापेक्षा कितीतरी सरस दराने वाढ साधत आहे, असा सुखद दिलासा गुरुवारी सायंकाळी जाहीर झालेल्या आकडेवारीने दिला. जुलै ते सप्टेंबर या दुसऱ्या तिमाहीत सकल राष्ट्रीय उत्पादनाचा म्हणजे पर्यायाने भारताच्या अर्थव्यवस्थेचा वाढदर ७.६ टक्के असा नोंदवला गेल्याची आकडेवारी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केली.**



रिझर्व्ह बँकेचा या संबंधाने अंदाज ६.५ टक्क्यांचा होता, तर इतर तज्ज्ञांच्या मते हा दर जास्तीत जास्त ७.२ टक्क्यांपर्यंत जाऊ शकेल असेच एकंदर कयास होते. त्या सर्व अंदाजांना मागे सोडून अर्थ-आकडेवारीतील ही तिमाहीतील आश्चर्यकारक झेप पाहता, आता अनेक अर्थतज्ज्ञ आणि देशी-विदेशी दलाली पेढ्यांनी संपूर्ण वर्षासाठी ७ टक्क्यांच्या जवळ नेणारे वाढीव अनुमान लगोलग व्यक्त केले आहेत. विशेषत: कायमच मरतुकड्या राहत आलेल्या शेतीला वगळता, अन्य क्षेत्रांमध्ये दिसून आलेली ही वाढ असल्याने उर्वरित सहामाहीतील कामगिरीच्या उजळतेस ती उपकारक नक्कीच ठरेल. त्यामुळे ताज्या आकडेवारीबाबत हर्षोल्हास व्यक्त करणाऱ्या प्रतिक्रिया निर्थक निश्चितच नाहीत. तथापि थोडे खोलात जाऊन, क्षेत्रवार आणि घटकांनुरूप ताज्या आकडेवारीची फोड करून पाहणेदेखील तितकेच आवश्यक आहे. सखोल परीक्षणांतून लक्षात येईल की, सामान्य सरासरीपेक्षा तुटीच्या आणि अनियमित राहिलेल्या पर्जन्यमानाचे देशाच्या शेती क्षेत्राच्या भिकार कामगिरीत प्रतिबिंब उमटले आहे. पहिल्या तिमाहीत ३.५ टक्क्यांची या क्षेत्राने नोंदवलेली वाढ दुसऱ्या तिमाहीत निम्म्याहून कमी अवघ्या १.२ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहिली. करोनाकाळात टाळेबंदीने देशाची अर्थचाके एकाच जागी थिजली असताना, अर्थव्यवस्थेत गतिमानता दाखवणारा हाच एक घटक होता, हे लक्षात घ्यायला हवे. शेतीला अपायकारक ठरलेला तुटीचा पाऊस हा निर्मिती क्षेत्र आणि बांधकाम यांसारख्या घटकांच्या मात्र पथ्यावर पडला आहे. सरलेल्या तिमाहीत या दोहोंमध्ये अनुक्रमे १३.५ टक्के आणि १३.३ टक्क्यांची दमदार वाढ दिसून आली आहे. विशेषत: गृहनिर्माण क्षेत्रासाठी गेले संपूर्ण वर्ष खूपच चांगले गेले आहे आणि यंदा जुलै ते सप्टेंबर अशा ऐन पावसाळ्यात फारसा व्यत्यय न येता या क्षेत्रात कामे सुरू राहिल्याचे हे आकडे द्योतक आहेत. चिंतेची लकेर निर्माण करणाऱ्या आकडेवारीचा एक घटक हा की, खासगी अंतिम उपभोग खर्च (पीएफसीई) हा सरलेल्या तिमाहीत अवघ्या ३.१ टक्क्यांच्या दराने वाढला आहे. अर्थात निवासी कुटुंबे आणि कुटुंबांना सेवा देणाऱ्या संस्था यांच्याकडून वस्तू आणि सेवांच्या अंतिम उपभोगावर झालेला खर्च हा एप्रिल-जून तिमाहीतील खर्चाच्या निम्म्याने बरोबरी करणाराही नाही. घरभाडे, वीज, पाणीपट्टी, शिक्षण, आरोग्य या मूलभूत गोष्टींसह, कपडेलत्ते, करमणूक, प्रवास, खानपान या खर्चाचा यात समावेश होतो. ताज्या आकडेवारीचा अन्वयार्थ लावायचा तर, संपूर्ण गणेशोत्सव आणि पुढे सणांचा हंगाम तोंडावर असताना जुलै-सप्टेंबर तिमाहीत ग्राहक बाजारपेठा फुललेल्या दिसल्याचे जे चित्र दिसून आले ते फसवे म्हणावे काय? पुढे आणखी कोड्यात टाकणारी बाब म्हणजे, सामान्य भारतीय ग्राहकांनी खरेदी केली नाही, तरी त्यांनी मोठ्या प्रमाणात कर्जे मात्र करून ठेवली. ही असुरक्षित वैयक्तिक कर्जे आणि क्रेडिट कार्डावरील उसनवारी इतक्या तीव्र गतीने वाढली की रिझर्व्ह बँकेला त्याला बांध घालण्यासाठी बँका आणि वित्तीय कंपन्यांवर निर्बंध आणावे लागले. शहरी बाजारपेठांतील मागणीची ही स्थिती तर ग्रामीण भागात तर आशेला वावच नाही असे वातावरण आहे. खरिपाची पिके लयाला गेल्याचे पाहणाऱ्या बहुतांश देशाच्या ग्रामीण भागासाठी, धरणातील पाणी साठ्याची स्थिती पाहता रब्बीचा पीक हंगामही जेमतेमच असेल. जुलै-सप्टेंबर तिमाहीच्या आकडेवारीत अपेक्षेप्रमाणे सेवा क्षेत्राने मजबूत वाढ दर्शविली आहे. मात्र सेवा क्षेत्रातील काही घटकांची कामगिरी सुस्पष्ट निराशादायी आहे, हेही लक्षात घ्यावे. मुख्यत: व्यापार, हॉटेल, वाहतूक आणि दळणवळण या क्षेत्रांमधील वर्षागणिक वाढ ही ५ टक्क्यांची पातळी गाठणारीही नाही. ही अत्यंत रोजगारप्रवण क्षेत्रे आहेत आणि कोट्यवधींची रोजीरोटी त्यावर अवलंबून आहे, हे पाहता काळजीचे कारण स्पष्ट व्हावे. वैयक्तिक उपभोग जेमतेम राहण्याच्या कोड्याचे उत्तर हेच असू शकेल.

## संपादकीय »

### अभिमानाची सभ्यता!


*संस्कृतीचा अभिमान हा राजकारणाचा विषय ठरतोच. पण हे राजकारण केवळ निवडणूक प्रचारापुरते नसते. ते केवढी वळणे घेऊ शकते, हे दाखवणाऱ्या दोन घडामोडी गेल्या आठवड्यात घडल्या.*

संस्कृतीचा अभिमान हा राजकारणाचा विषय ठरतोच. पण हे राजकारण केवळ निवडणूक प्रचारापुरते नसते. ते केवढी वळणे घेऊ शकते, हे दाखवणाऱ्या दोन घडामोडी गेल्या आठवड्यात घडल्या. 'सांस्कृतिक मालमत्ता करार' नावाचा हा करार ठरल्याप्रमाणे झाला तर भारतातून चोरट्या वा तस्करीच्या मार्गाने अमेरिकी वस्तू-संग्रहालयांत पोहोचलेल्या अनेक पुरातन मूर्ती वा ऐतिहासिक वस्तू मिळवण्याची प्रक्रिया किचकट न राहता सोपी होईल. हा करार दृष्टिपथात नसतानाही अमेरिकी संग्रहालयांनी गेल्या काही महिन्यांत अशा शंभराच्या आसपास मूर्ती भारताकडे रवाना केल्या आहेत. पण अन्य देशांशी करार करायचे, संस्कृतीचा ठेवा परत मिळवायचा हे इतके सोपे नसते. जो ठेवा 'बेकायदा मार्गाने' हिरावला गेला तोच परत मागता येईल, यावर अनेक देश बोट ठेवतात.

**हेन्री किसिंजर यांचे वर्णन करायचे तर सर्वाधिक लिहिते आणि ज्यांच्यावर सर्वाधिक लिहिले गेले असे आंतरराष्ट्रीय मुत्सद्दी असे करणे रास्त. वास्तविक त्यांच्या नंतर अमेरिकेच्या अध्यक्षांचे संरक्षण सल्लागार राहिलेले झिबिग्र्यु ब्रेझंस्की वा बिल क्लिंटन यांचे सँडी बर्गर वा तत्कालीन सोव्हिएत रशियाचे एडवर्ड शेवर्दनाझे ही नावेही तशी चर्चेत राहिली. त्या त्या वेळी होती. ब्रेझंस्की यांनीही ग्रंथलेखन केले.**

# सर्वाधिक लिहिता-लिहिले गेलेला मुत्सद्दी!

तथापि किसिंजर यांना जितका माध्यम-पैस मिळाला तितका अन्य कोणालाही नाही, हे मान्य करावे लागेल. किसिंजर यांनी विपुल लेखन केले आणि त्यांच्यावरही विपुल लेखन केले गेले. माझ्या घरच्या संग्रहातच किसिंजर यांची पाच-सहा पुस्तके तरी असतील. त्यांच्याविषयी वाचनाचा लळा लागण्याचे श्रेय गोविंदराव तळवलकर यांचे. त्यांच्या 'वाचता वाचता'त दोनचारदा तरी त्यांनी किसिंजर यांच्याविषयी लिहिले असावे. त्यापैकी एक लेख किसिंजर यांच्या चरित्रग्रंथाविषयी होता. कोणा काल्ब बंधूंनी किसिंजर यांची राजकीय चरित्रगाथा लिहिली होती आणि तिचा परिचय गोविंदरावांनी करून दिला होता. हाच काळ वॉटरगेट इत्यादी प्रकरणांचा. त्या वाचनाची गोडी निर्माण झाल्याने प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर किसिंजर ग्रंथरूपाने भेटत राहिले आणि त्यांची तसेच त्यांच्यावरील पुस्तके समाधान देत गेली. त्यांच्यावरील पुस्तकांत अव्वल दर्जाचे ठरते ते वॉल्टर आयझॅक्शन




यांचे लेखन. हे आयझॅक्शन 'सीएनएन' वाहिनीचे उच्चपदस्थ आहेत. माझे आवडते चरित्रलेखक. आईन्स्टाईन यांचे सर्वोत्कृष्ट चरित्र आयझॅक्शन यांनीच लिहिलेले आहे. ॲपलचा स्टीव्ह जॉब्स ते लिओनार्दो द विंचीपर्यंत अनेकांची उत्तमोत्तम चरित्रे आयझॅक्शन यांनी लिहिलेली आहेत. सगळी भव्य. यावरून खरे तर आयझॅक्शन यांच्या दमसासाचा अंदाज येतो. सगळी तशीच रसरशीत. खुद्द आयझॅक्शन यांना तुमचे तुम्ही लिहिलेले सर्वात आवडते चरित्र कोणाचे असे विचारले असता ते किसिंजर यांचा दाखला देतात. याचे कारण किसिंजर यांच्या व्यक्तिमत्त्वास असलेले कंगोरे. त्यांच्याविषयी कोणी तटस्थ असू शकेल असे वाटत नाही. त्यांच्या निधनानंतर ज्या टोकाच्या प्रतिक्रिया उमटल्या त्यावरूनही हे कळावे. ज्येष्ठ मुत्सद्दी ते क्रूर युद्ध गुन्हेगार अशी विविध विशेषणे त्यांच्याबाबत वापरली गेली. ती सर्व तितकीच खरी ठरतात. म्हणून किसिंजर यांस एका कोनाड्यात बसवता येत नाहीत. आयझॅक्शन तसे करतही नाहीत. स्वत: पत्रकार असल्याने आयझॅक्शन यांस वाचकांस काय भावेल याचा अंदाज आहे आणि जे भावणार नाही ते कोणत्या प्रकारे दिले तर स्वीकारले जाते याची खात्री आहे. त्यामुळे कोठेही पाल्हाळीक न होता जितके बोलावे तितकेच आयझॅक्शन आपल्या कथानायकाविषयी बोलतात. पुस्तकात माझ्या मते सर्वाधिक रोचक भाग आहे तो किसिंजर यांचे अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांस वॉटरगेट प्रकरणात पायउतार व्हावे लागते तो. त्यावर 'ऑल द प्रेसिडेंट्स मेन' पुस्तक वाचलेले आणि नंतर चित्रपट पाहिलेला असल्याने हा भाग अधिक मनात उतरतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 24 डिसेंबरपर्यंत मराठा आरक्षण द्यावं!

## जरांगे-पाटलांनी सरकारला दिला थेट इशारा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**२४ डिसेंबरपर्यंत महाराष्ट्रातील मराठा समाजाला आरक्षण देण्याचा शब्द सरकारनं दिला आहे. २४ डिसेंबरपर्यंत मराठा समाजाला आरक्षण द्यावं. अन्यथा सरकारला जड जाईल. आमच्यावर अन्याय करत राहिला, तर मर्यादा आणि संयम कितीदिवस बाळगायचा, याचाही विचार करावा लागेल, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारला दिला आहे.**

ते जालन्यातील सभेत बोलत होते. मनोज जरांगे-पाटील म्हणाले, "सरकारच्या शिष्टमंडळानं सर्व गुन्हे मागे घेण्याचं आणि एकालाही अटक न करण्याचं आश्वासन दिलं होतं. मग, आंतरवालीतील कार्यकर्त्यांना अटक का करण्यात आली? मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी कुठला डाव रचला आहे? खोटं बोलून आमच्याशी गद्दारी करू नका. दोन दिवसांत सरकारनं सर्व गुन्हे मागे घ्यावे." "पोलीस अधीक्षक आणि पोलिसांनी आमच्यावर प्राणघातक हल्ला घडवला, हे आम्ही विसरणार नाही. पुन्हा डाव रचू नका.

पहिल्या अधीक्षकांना बढती देण्यात आली. आता कार्यकर्त्यांना अटक करून दुसऱ्या अधीक्षकांना बढती देणार का? पण, आम्ही पाच कोटी मराठे तुरुंगात जाण्यास भीत नाही," असंही जरांगे-पाटलांनी सांगितलं. "लातूरमध्ये कलम १४४ लागू करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी मराठा समाजाचा रोष पत्करू नये. लातूरमध्ये सभा होणार आहे," असा निर्धार जरांगे-पाटलांनी व्यक्त केला. "ओबीसीमधील जातींवरही यांनी ( छगन भुजबळ ) अन्याय केला आहे. २००९ ते २०१४ मधील ओबीसी महामंडळातील ८० टक्के हिस्सा एकट्यांनी खाल्ला आणि २० टक्के बाकींच्या ३०० जातींना दिला आहे. ओबीसी नेते म्हणून घेणारे बाकींच्यावर अन्याय करत आहेत," अशी टीकाही जरांगे-पाटलांनी छगन भुजबळांवर केली आहे. राठा आरक्षणाचा निर्णय अंतिम टप्प्यात आला आहे, असं सांगत आरक्षण न मिळाल्यास शांततेत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचं आज जालन्यातील सभेत मनोज जरांगेंनी स्पष्ट केलं. तसंच, यावेळी त्यांनी मुंबईत येणार असल्याचाही इशारा दिला. मिश्किल भाषेत आज त्यांनी मुंबई दर्शन करण्यास येणार असल्याचं सांगितलं. तसंच, मंत्रालय किती उंच आहे हेही या मुंबई दर्शनावेळी पाहणार असल्याची खोचक टीका जरांगे पाटलांनी केली.



मनोज जरांगे पाटील म्हणाले, काहीजण म्हणतात की २४ तारखेनंतर काय? आपण त्याबाबत निर्णय घेऊ. तुम्हाला घाई का आहे? २४ तारखेनंतर काय करायचं याबाबत मराठा समाजाची बैठक घेऊ. सरकारने आपले गुन्हे मागे घेतले नाही, मराठ्यांना ओबीसीत आरक्षण दिलं नाही तर पुढे काय करायचं याकरता मराठा समाजाची १७ तारखेला बैठक घेणार आहोत. यामध्ये उपोषणकर्ते, साखळी उपोषणकर्ते आणि मराठा समाज यांची एकत्रित अंतरवालीला किंवा पाऊस असेल तर एखाद्या मंगल कार्यालयात १७ डिसेंबरला बैठक घेतली जाईल. हे अन्यायच करायला लागलेत तर काय करणार? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

### आम्ही कोणत्याही टोकाला जाऊ

» सगळे लोक मुंबईत जातात. अख्खं जग मुंबईत येत असतं. मग मुंबई आमची आहे की नाही? मुंबईला यायला आम्हाला काही हरकत नाही. आम्ही मुंबईत येऊन आंदोलन करणार नाही. मुंबईचं विमानतळ कसं आहे ते आम्हाला पाहायचं आहे. मुंबईचा समुद्र, गेट ऑफ इंडिया बघायचा आहे. बिस्किट कसली बनतात हे पाहायचं आहे. मुंबईत येऊन आरक्षण द्या असं म्हणणार नाही. पण, ताज हॉटेल म्हणजे काय, शेअर मार्केट म्हणजे काय? ते कसलं असतं हे आम्हाला पाहायचं आहे. तिथे खूप जपानच्या कंपन्या आहेत हे पाहायचं आहे. नोटा छापायची इमारत पाहायची आहे. मंत्री कोणत्या गादीवर बसतात हे पाहायचं आहे. मंत्रालय किती उंच आहे हे पाहुदेत. लोकं म्हणतात की वर पाहायला गेलं की टोपी पडते. आम्हालाही पाहायचं आहे. त्याची सोय करावी लागेल, अशा मिश्किल शब्दांत आज जालन्यातील सभेत मनो जरांगे पाटलांनी गाजवली. आमच्या जातीच्या लेकराच्या न्यायासाठी आम्ही कोणत्याही टोकाला जाऊ शकतो. तुम्ही आम्हाला न्याय देणार असाल तर आम्ही तुम्हाला साथ द्यायला तयार आहोत. पण, तुम्ही जर आमच्या लेकराचे मुडदे पाडले तर आम्हीही मुंबईत यायला मागे पुढे बघणार नाही.

# शरद पवारांनीच भाजपसोबत जायला सांगितले

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा खळबळजनक खुलासा

। हिंगोली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मला सत्तेत जायला शरद पवार यांनीच सांगितले होते. मी राष्ट्रवादीच्या पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा देतो. तू भाजपसोबत जा, असे त्यांनी सांगितल्याने आम्ही भाजपसोबत सत्तेत गेलो, असा खळबळजनक खुलासा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी येथे केला. शरद पवार यांच्या राजीनामानाट्याचाही पर्दाफाश करीत अजित पवारांनी आपल्या काकांवर कोणताही आडपडदा न ठेवता थेट हल्ला चढवला. राजीनामा देतो म्हणून सांगितले आणि पुन्हा राजीनामा मागे घेण्यासाठी आंदोलन करायलाही लावले. आम्हाला असेच सतत गाफील ठेवले गेले, अशी तक्रारही अजित पवार यांनी केली.**



राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे दोन दिवसांचे शिबिर कर्जत येथे झाले. याच शिबिरात अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत पवारांचा कुटुंबकलह विकोपाला जाणार याचे स्पष्ट संकेत देत शरद पवार, सुप्रिया सुळे यांच्या विरोधात जोरदार भूमिका मांडली. अजित पवार म्हणाले, मी 32 वर्षांपासून मंत्री म्हणून काम करीत आहे. त्यामुळे मला कामाचा चांगला अनुभव आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा माझ्या अध्यक्षतेखाली काम करत आहे, अशी वर्तमानातून सुरुवात करत अजित पवारांनी मग शरद पवारांनी घडवलेल्या राजीनामानाट्यावरील पडदा वर करण्यास सुरुवात केली. खरे तर शरद पवारांनीच मला मी राजीनामा देतो, तू अध्यक्ष हो, असे सांगितले. भाजपसोबत जाण्याचा सल्लाही त्यांनीच दिला. त्यानुसारच आम्ही सत्तेत गेलो. अजित पवार सांगू लागले, म्हणाले, नीट ऐका. मी स्वतः, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे, जयंत पाटील, अनिल देशमुख, रामराजे नाईक-निंबाळकर, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे असे आम्ही दहा-बाराजण देवगिरीला बसलो होतो. आमच्यासोबत अनिल देशमुखही येणार होते.

मात्र त्यांना मंत्रिपद मिळत नसल्याने ते आले नाहीत. भाजपसोबत जायचे पण कसे जायचे याचा विचार सुरू होता. डायरेक्ट साहेबांना सांगितले तर त्यांना काय वाटेल हा प्रश्न होता. म्हणून आम्ही सुप्रिया सुळेंना बोलावून घेतले. आम्ही कशासाठी बोलावले हे मात्र सांगितले नव्हते. तिला आम्ही म्हणालो, सर्व जीवाभावाचे सहकारी आहेत. लोकशाहीत बहुमताचा आदर करावा लागतो. तरच संघटना पुढे जाते. (सुप्रियांना विषय समजला) त्या म्हणाल्या, मला सात ते दहा दिवस द्या. मी साहेबांना कन्व्हिन्स करते. काय करायचे ते माझ्यावर सोपवा. अजित पवार आता कहानी पुढे नेऊ लागले. म्हणाले, आम्ही सात-आठ दिवस थांबलो. पुन्हा आम्ही एकत्र बसलो. जयंत पाटील, अनिल देशमुख होते. भाजपसोबत सरकारमध्ये गेले पाहिजे. आमदारांच्या कामांना स्थगिती मिळाली आहे. अनेक प्रश्न आहेत. याचा विचार आम्ही केला आणि मग विचार करून डायरेक्ट साहेबांकडे गेलो आणि त्यांना आमचा निर्णय सांगितला.

### जयंत पाटलांच्या उपस्थितीत निर्णय

» शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील या सर्वांच्या उपस्थितीत पक्षाच्या बैठकीत भाजपसोबत सत्तेत जाण्याचा निर्णय झाला होता. मागाहून तो फिरवला गेला. मग राजीनाम्याचे नाटक करून राजीनामा मागे घेण्याचे आंदोलनही उभे केले गेले. कोर्टबाजीत तुम्ही पडू नका, असे सांगून आम्हाला गाफील ठेवले आणि शरद पवार यांनीच न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला. तरीही आम्ही डगमगणार नाही. त्यामुळे आम्ही आता आमच्या वाटेने पुढे जाऊ आणि आम्हीच ही लढाई जिंकू, असा दावा अजित पवार यांनी केला.

# महागाईचा झटका : गॅस सिलेंडरचे दर वाढले!

## महागाईच्या गर्तेत अडकलेल्या सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा चाप बसणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**1 डिसेंबर, आजपासून 2023 च्या शेवटच्या महिन्याला सुरुवात झाली आहे. वर्षाचा शेवटचा महिना सुरू होताच महागाईचा आणखी एक मोठा झटका सर्वसामान्यांना बसला आहे. LPG सिलेंडर (LPG CYLINDER) आजपासून म्हणजेच, 1 डिसेंबर 2023 पासून, वर्षाच्या शेवटच्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून महाग झाला आहे. आधीपासूनच महागाईच्या गर्तेत अडकलेल्या सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा चाप बसणार आहे.**



महिन्याच्या पहिल्याच दिवशी, तेल विपणन कंपन्यांनी एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतींत 41 रुपयांनी (LPG PRICE HIKE) वाढ केली आहे, तर ही वाढ 19 KG व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या (COMMERCIAL LPG PRICE) दरांत करण्यात आली आहे. अद्ययावत किमतींनुसार, राजधानी दिल्लीत एका सिलिंडरची किंमत आता 1796.50 रुपये झाली आहे. तर देशाची आर्थिक राजधानी मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत 1728.00 रुपयांवरुन 1749.00 रुपये झाली आहे.

एलपीजी सिलेंडरच्या किमती IOCL वेबसाईटवर अपडेट करण्यात आल्या असून बदललेल्या किमती 1 डिसेंबरपासून लागू झाल्या आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, दिवाळीपूर्वी तेल कंपन्यांनी 19 किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतींत 103 रुपयांनी वाढ केली होती आणि 1 नोव्हेंबर 2023 रोजी दिल्लीत त्याची किंमत 1833.00 रुपये झाली होती, मात्र 16 नोव्हेंबरला छठ पुजेच्या निमित्तानं एलपीजी सिलेंडवर दिलासा देण्यात आला होता. आणि सिलेंडरची किंमत 50 रुपयांनी कमी करत 1755.50 रुपये झाली होती, मात्र वर्षाच्या अखेरच्या महिन्यात पुन्हा एकदा एलपीजीच्या व्यावसायिक सिलेंडरचे दर पुन्हा एकदा 41 रुपयांनी वाढवले आहेत. ताज्या बदलांनंतर व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या नव्या किमतींबद्दल सांगायचं तर, नमूद केल्याप्रमाणे, राजधानी दिल्लीत आजपासून 19 किलोचा एलपीजी सिलेंडर 1755.50 रुपयांऐवजी 1796.50 रुपयांना मिळणार आहे. तर कोलकातामध्ये त्याची किंमत 1885.50 रुपयांवरून 1908.00 रुपये करण्यात आली आहे.

### आजपासून नवे दर लागू

» अद्ययावत किमतींनुसार, राजधानी दिल्लीत एका सिलिंडरची किंमत आता 1796.50 रुपये झाली आहे. तर देशाची आर्थिक राजधानी मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत 1728.00 रुपयांवरुन 1749.00 रुपये झाली आहे. एलपीजी सिलेंडरच्या किमती IOCL वेबसाईटवर अपडेट करण्यात आल्या असून बदललेल्या किमती 1 डिसेंबरपासून लागू झाल्या आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, दिवाळीपूर्वी तेल कंपन्यांनी 19 किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतींत 103 रुपयांनी वाढ केली होती आणि 1 नोव्हेंबर 2023 रोजी दिल्लीत त्याची किंमत 1833.00 रुपये झाली होती, मात्र 16 नोव्हेंबरला छठ पुजेच्या निमित्तानं एलपीजी सिलेंडवर दिलासा देण्यात आला होता. आणि सिलेंडरची किंमत 50 रुपयांनी कमी करत 1755.50 रुपये झाली होती, मात्र वर्षाच्या अखेरच्या महिन्यात पुन्हा एकदा एलपीजीच्या व्यावसायिक सिलेंडरचे दर पुन्हा

मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत 1728.00 रुपयांवरुन 1749.00 रुपये झाली आहे. तर चेन्नईमध्ये व्यावसायिक सिलेंडरसाठी 1942.00 रुपयांऐवजी 1968.50 रुपये मोजावे लागतील. एकीकडे व्यावसायिक सिलेंडरच्या किमतींमध्ये सातत्यानं बदल पाहायला मिळत आहेत. तर तेल कंपन्यांनी 14 किलोग्रॅम वजनाच्या घरगुती सिलेंडच्या किमतींमध्ये कोणताही बदल केलेला नाही. IOCL च्या अधिकृत वेबसाईटवर नमूद करण्यात आल्यानुसार, दिल्लीत घरगुती सिलेंडर 9.3 रुपयांना, कोलकात्यात 929 रुपयांना, मुंबईत 902.50 रुपयांना आणि चेन्नईत 918.50 रुपयांना उपलब्ध आहे.

# भारतात महिलांच्या रोजगारात झाली वाढ!

## कृषी क्षेत्रानं दिल्यात सर्वाधिक नोकऱ्या

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारताचा विकास (DEVELOPMENT OF INDIA) करायचा असेल तर, निम्म्या लोकसंख्येचे आर्थिक हात मजबूत असले पाहिजेत. जागतिक बँकेनंही (WORLD BANK) अलिकडेच एका निवेदनात म्हटलं होतं की, भारताला प्रगतीच्या शिखरावर चढायचं असेल तर महिलांसाठी उत्तम रोजगाराच्या संधी (BETTER EMPLOYMENT OPPORTUNITIES FOR WOMEN) उपलब्ध करुन द्याव्या लागतील.**



महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम (WOMEN ARE FINANCIALLY EMPOWERED) झाल्या, तर भारताचा विकास होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. भारतातील शहरी भागात महिलांमधील रोजगार वाढला आहे. महिलांचा बेरोजगारीचा दर (UNEMPLOYMENT RATE OF WOMEN) 8.6 टक्क्यांवर आला आहे. मात्र, अजूनही महिलांना चांगल्या नोकऱ्या (JOBS) मिळत नाहीत, ही चिंतेची बाब आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम मंत्रालयाच्या वतीनं जारी करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, जुलै-सप्टेंबर या तिमाहीत महिलांच्या बेरोजगारीच्या दरात घट झाली आहे. मात्र, त्यांना नियमित रोजगार मिळत नाही. त्यामुळे या तिमाहीत पगारदार महिलांची संख्या 55 टक्क्यांवर घसरली आहे. याशिवाय पगारदार नोकऱ्या करणाऱ्या पुरुषांची संख्याही कमी झाली आहे, ती आता फक्त 47 टक्के उरली आहे. दरम्यान, या तिमाहीतही अनियमित नोकऱ्या करणाऱ्या पुरुषांची संख्या तेवढीच राहिली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत शहरांमधील रोजगाराची आकडेवारी सारखीच राहिली आहे. कृषी क्षेत्रात जवळपास सर्वच नव्या नोकऱ्या निर्माण झाल्याचं सर्वेक्षणातून समोर आलं आहे, तर इतर क्षेत्रातील नोकऱ्यांची संख्या घटली आहे. खरीप हंगामातील पेरण्या झाल्यामुळे कृषी क्षेत्रातील रोजगार वाढला आहे. मात्र, पेरणीचा हंगाम संपल्यानं या नोकऱ्याही गायब होतील, ही निराशाजनक बाब आहे. त्यामुळे पुढील तिमाहीतील आकडेवारी निराशाजनक असू शकते. सरकार दर तिमाहीत शहरी भागांत नोकरीची आकडेवारी जाहीर करतं. या सर्वेक्षणात, सर्वेक्षणाच्या वेळी सात दिवसांत एक तासही काम मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीला रोजगार मिळाला, असंच मानलं जात आहे. बेरोजगारीच्या दरामध्ये 15 वर्ष आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींचा समावेश होतो. सांख्यिकी आणि कार्यक्रम मंत्रालयाच्या वतीनं जारी करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, जुलै-सप्टेंबर या तिमाहीत महिलांच्या बेरोजगारीच्या दरात घट झाली आहे. मात्र, त्यांना नियमित रोजगार मिळत नाही. त्यामुळे या तिमाहीत पगारदार महिलांची संख्या 55 टक्क्यांवर घसरली आहे. याशिवाय पगारदार नोकऱ्या करणाऱ्या पुरुषांची संख्याही कमी झाली आहे,.

# बंगळूरुत ६८ शाळांत बॉम्ब ठेवल्याची धमकी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

येथे शुक्रवारी सकाळी ६८ खासगी शाळांना त्यांच्या आवारात-परिसरात बॉम्ब असल्याचा इशारा देणारा 'ई-मेल' आला. हा 'ई-मेल' मिळाल्यानंतर शाळेतील कर्मचारी आणि पालकांमध्ये घबराट पसरली. विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना तत्काळ शाळेच्या आवारातून बाहेर काढण्यात आले. हा संदेश ' "KHARIJITES@BEEBLE. COM" या 'ईमेल आयडी'वरून आला आहे, अशी माहिती गृहमंत्री जी परमेश्वरा यांनी पत्रकारांना दिली. पोलिसांनी सांगितले, की शाळेच्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब पोलिसांना याची माहिती दिली. त्यानंतर ते बॉम्ब निकामी पथक आणि तोडफोड नियंत्रण व तपास पथकासह संबंधित शाळांत पोहोचले. संध्याकाळपर्यंत कोणतीही संशयास्पद वस्तू सापडली नाही. बॉम्बची धमकी मिळालेल्या ६८ शाळांपैकी ४८ शाळा शहराच्या हद्दीत आहेत तर उर्वरित बंगळूरु ग्रामीण हद्दीत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या घटनेची माहिती विद्यार्थ्यांच्या पालकांना समजताच कमालीची घबराट पसरली. आपापल्या मुलांना सुखरूप घरी आणण्यासाठी या पालकांनी शाळेत धाव घेतली. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले, की आतापर्यंत बंगळूरुमधील ६८ शाळांना बॉम्ब ठेवल्याबद्दल ईमेल मिळाले आहेत. बॉम्ब असल्याच्या या धमकीचा संदेश एकाच 'ईमेल आयडी'वरून आला होता. शोध मोहीम जवळपास पूर्ण झाली आहे आणि आतापर्यंत आमच्या पथकाला कोणत्याही शाळेच्या परिसरात कोणतीही संशयास्पद वस्तू सापडलेली नाही. पोलिसांनी सांगितले की, गेल्या वर्षीही काही समाजकंटकांनी बंगळूरुच्या शाळांमध्ये बॉम्ब असल्याचा दावा करणारे असेच 'ई मेल' पाठवले होते.

# 'सालार'चा ट्रेलर आऊट

बाहुबली फेम प्रभासच्या सालार या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात चर्चा सुरु आहे. आता त्याचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून त्यावर नेटकरी, चाहत्यांच्या प्रतिक्रियेचा वर्षाव झाला आहे. प्रभासची या चित्रपटामध्ये मुख्य भूमिका असून तो एका रिबेल अर्थात बंडखोराच्या भूमिकेत आहे. एका शहरासाठीची आणि राजकीय अस्तित्वासाठीची लढाई यात दिसून येते. सालार - पार्ट १ सिझफायर असं या सिनेमाचं नाव आहे. अर्थातच या सिनेमाचे पुढचे भागही येणार असल्याचं निर्मात्यांनी या ट्रेलरमध्येच सांगितलं आहे. येत्या २२ डिसेंबर रोजी जगभरात हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे. केजीएफ चॅप्टरचे दिग्दर्शक प्रशांत नील यांनी सालारचे दिग्दर्शन केले असून त्याची चाहत्यांना बऱ्याच दिवसांपासून उत्सुकता आहे. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात हा चित्रपट प्रदर्शित होणार असून त्याची टक्कर किंग खानच्या डंकीशी आहे. राजकुमार हिरानी यांच्या डंकीची क्रेझ देखील मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून आले आहे. सालारमध्ये प्रभास हा वेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहे. आता व्हायरल झालेल्या ट्रेलरनं प्रेक्षकांची पसंती मिळवली आहे. त्यातील ॲक्शन सीन, ग्राफिक्स हे सारं प्रभावी असल्याच्या प्रतिक्रिया प्रेक्षकांच्या आहेत. हॉलीवूडमधील दिग्गज ॲक्शन डिरेक्टरची मदत घेऊन सालारमधील ॲक्शन सीन शुट करण्यात आले आहे. ज्याची बरीच चर्चा सोशल मीडियावर रंगली होती. सालार पार्ट १ मधील ते सीन्स देखील हॉलीवूडच्या चित्रपटांशी बरोबरी करणारे आहेत असे म्हटले जात आहे. दिग्दर्शक प्रशांत नील यांनी हा चित्रपट इंटरनॅशनल लेव्हल स्टाईलमध्ये करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्याची लोकप्रियता वाढताना दिसत आहे. सालारच्या टीमनं प्रमोशनसाठी चांगलीच मेहनत घेतली आहे. प्रभासचा मागील आदिपुरुष चित्रपट याला म्हणावा असा प्रतिसाद मिळाला नव्हता. त्याची चर्चा झाली मात्र प्रभासच्या अभिनयावर प्रेक्षक नाराज झाले होते.

# गौतमी पाटीलच्या 'घुंगरु'चा ट्रेलर आऊट!

सबसे कातील गौतमी पाटील (GAUTAMI PATIL) सध्या तिच्या आगामी 'घुंगरु' (GHUNGROO) या सिनेमामुळे चर्चेत आहे. लवकरच हा सिनेमा प्रदर्शित होणार असून आता या सिनेमाचं पोस्टर आणि ट्रेलर रिलीज करण्यात आला आहे. 100 चित्रपटगृहात हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.
गौतमी पाटीलचा पहिला सिनेमा 'घुंगरु' हा सिनेमा आहे. तमाशा लोक कलावंत यांच्या जीवनाचे वास्तव मांडणारा 'घुंगरु' हा सिनेमा 15 डिसेंबर रोजी राज्यातील 100 स्क्रीनवर प्रदर्शित होणार असल्याचे या सिनेमाचे दिग्दर्शक बाबा गायकवाड (BABA GAIKWAD) यांनी सांगितले . आज पंढरपूर येथे 'घुंगरु' सिनेमाचं पोस्टर आणि ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. ट्रेलर लॉन्च दरम्यान गौतमी उपस्थित नव्हती. 15 डिसेंबर पासून राज्यातील चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असलेल्या 'घुंगरु' या सिनेमात गौतमी पाटीलच्या आयुष्याचा संघर्ष दाखवण्यात आला असल्याचे दिग्दर्शक बाबा गायकवाड यांनी सांगितले . तब्बल 100 स्क्रीनवर गौतमी पाटीलचा जीवन संघर्ष प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. 10 डिसेंबर पासून गौतमी पाटील स्वतः या सिनेमाचे प्रमोशन राज्यातील प्रमुख शहरात करणार आहे. लावणी, प्रेम गीत आणि आयटम गीत अशी गाणी चित्रपटात असणार आहेत. देशातील सात राज्यात सिनेमाचे चित्रीकरण झाले आहे .

# तुम्हीही बळी ठरु शकता!

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मुलभूत गरजा आहेत, असं आपण म्हणतो, पण सध्या सोशल मीडिया (SOCIAL MEDIA) ही देखील माणसाची मुलभूत गरज झालीये, असं म्हणता येईल. तासंतास सोशल मीडिया ॲक्टिव असणारे बरेच लोक आपण आजूबाजूला पाहतो. पण सोशल मीडियाचे जेवढे फायदे आहेत, तेवढे तोटे देखील आहेत. अशातच गेल्या काही दिवसांपासून तुम्ही डीपफेक व्हिडीओ आणि फोटो याबद्दल ऐकत असाल. काही सेलिब्रिटींचे डीपफेक फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. अभिनेत्री रश्मिका मंदाना, आलिया भट्ट (ALIA BHATT) आणि कतरिना कैफ या सेलिब्रिटींचे डीपफेक फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाले. पण सेलिब्रिटींप्रमाणेच सर्वसामन्य व्यक्तींचे देखील डीपफेक फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होऊ शकतात का? तसेच हे डीपफेक व्हिडीओ कसे तयार केले जातात? असे प्रश्न अनेकांना पडले असतील. सायबर तज्ज्ञ तन्मय दीक्षित यांनी एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीमध्ये डीपफेक व्हिडीओ आणि फोटो याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. सायबर संस्कार या संस्थेचे तन्मय दीक्षित यांनी सांगितले की, डीपफेक ही एक अशी टेक्नॉलॉजी आहे, ज्याच्यामध्ये आपण जो सोर्स फोटो अपलोड करतो, त्याचा वापर दुसऱ्या फोटो किंवा व्हिडीओमध्ये करुन डीपफेक व्हिडीओ किंवा फोटो तयार केला जातो. मुलांचे किंवा मुलींचे मल्टिपल फोटो वेगवेगळ्या अँगलने सोशल मीडियावर अपलोड केले असतील तर टेक्नॉलॉजीचा वापर करुन त्याचा डीपफेक व्हिडीओ किंवा फोटो तयार केला जाऊ शकतो.



# श्रीदेवीवर बायोपिक येणार का?

बॉलिवूडच्या दिग्गज अभिनेत्री श्रीदेवी यांनी अनेक दशक प्रेक्षकांचे मनोरंजन केले. त्यांच्या चाहत्यांची संख्या काही कमी नाही. गेल्या काही दिवसांपासून श्रीदेवी यांच्यावर बायोपिक येणार अशी चर्चा सुरु होती. कारण सध्या क्रीडा, राजकारण यासह प्रत्येक क्षेत्रातील लोकप्रिय आणि प्रसिद्ध व्यक्तींचे आयुष्य मोठ्या पडद्यावर प्रेक्षकांना दाखविले जाते. या बायोपिकला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसादही मिळत असतो. त्यामुळे श्रीदेवी यांची कहाणी रुपेरी पडद्यावर पाहण्याची प्रेक्षकांना उत्सुकता होती. श्रीदेवी यांच्या जीवनावर चित्रपट बनवणार का? असा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून चाहत्यांना पडला होता. आता या प्रश्नाचे उत्तर त्यांचे पती बोनी कपूर यांनी दिले आहे. एक बालकलाकार म्हणून चित्रपटसृष्टीच्या सुरुवातीपासून ते भारताची पहिली महिला सुपरस्टार होण्यापर्यंतचा श्रीदेवीचा जीवनपट हा एक अद्भुत प्रवास असेल असं अनेक निर्मात्यांना वाटत होते. श्रीदेवीच्या मृत्यूचे कारण रहस्यमय मानणारे लोकही कमी नाहीत. त्यामुळे श्रीदेवींच्या बायोपिकची चाहत्यांनाही प्रतिक्षा होती. मात्र आता बोनी कपूर यांनी याविषयी चाहत्यांना माहिती दिली आहे. बॉलीवूडमध्ये एकापाठोपाठ एक बायोपिक बनवले जात असताना बोनी कपुर यांनी श्रीदेवींच्या बायोपिकबाबत सांगितले की ते या कल्पनेच्या विरोधात आहेत. बोनी कपूर यांनी सांगितले की, त्यांच्या दिवंगत पत्नीवर बायोपिक बनवण्यासाठी त्यांच्याकडे अनेक प्रस्ताव आले आहेत. पण श्रीदेवीवर कधीही बायोपिक बनवणार नाही. ते म्हणाले की, 'मी श्री यांच्यावर कधीही बायोपिक बनवणार नाही. मला त्यांच्या जीवनावर चित्रपट बनवण्याच्या अनेक ऑफर आल्या, पण मी कधीच तो बनवण्यास तयार नाही. ही माझ्यासाठी अत्यंत वैयक्तिक बाब आहे. श्रीदेवीला ओळखणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती घेऊन पुस्तके लिहिली जात आहेत. मला तेही करायचे नाही.' बोनी आणि श्रीदेवी यांनी १९९६ साली लग्न केले होते.

# वय नव्हे तर तुमचा अभिनय जास्त महत्वाचा!

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री राणी मुखर्जी ही नेहमीच तिच्या परखड वक्तव्यांसाठी ओळखली जाते. तिनं इफ्फीमध्ये केलेल्या त्या वक्तव्यावरुन वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली असताना आता पुन्हा तिनं वय आणि कलाकारांना मिळणाऱ्या भूमिका यावरुन केलेलं वक्तव्य लक्ष वेधून घेताना दिसत आहे. राणी म्हणते, मी जेव्हा वीस वर्षांची होते तेव्हा माझ्या वाट्याला आईची भूमिका आली होत.मी ती प्रामाणिकपणे केली. मला ती भूमिका साकारताना कुठलाही कमीपणा जाणवला नाही. माझ्या तिसऱ्या चित्रपटात देखील मला आईची भूमिका करावी लागली. त्या चित्रपटाचे नाव कुछ कुछ होता है असे होते. तसेच ता रा रम पम या चित्रपटामध्ये देखील मी दोन मुलांची आई ही भूमिका निभावली होती. राणी म्हणते, कलाकारानं त्याच्या वाट्याला जे काम येतं ते प्रामाणिकपणे करावं. काही भूमिका तुम्हाला खूप काही शिकवून जातात. त्यातून तुम्ही घडता. अमूक एखादी भूमिका तुम्हाला सुट होत नाही, तुमच्या वयापेक्षा ती जास्त आहे अशावेळी त्या भूमिकेला कसा न्याय देता येईल याचा विचार जास्त महत्वाचा शेवटी तुम्हाला अभिनय येतो की नाही हे त्या भूमिकेतून समोर येते. जे कुणी त्यावरुन तुमचे मुल्यमापन करतात त्यांना मला सांगायचे आहे की, वय नव्हे तर तुमचा अभिनय जास्त महत्वाचा आहे. तुमच्या वयापेक्षा जास्त वयाच्या भूमिका तुमच्या वाटेला आल्या की, तुम्ही नाराज न होता त्या भूमिका आणखी कशा प्रभावीपणे करता येतील याचा विचार करण्याची गरज आहे. माझी नेहमीच एक भूमिका राहिली आहे ती म्हणजे मी माझ्या प्रेक्षकांना त्या भूमिकेतून नवं काय देऊ शकेल याचा विचार जास्त महत्वाचा आहे. त्यातून मिळणारं समाधान मोठं आहे. राणीच्या मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे या चित्रपटानं प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते. त्याला चित्रपट समीक्षकांकडून देखील गौरविण्यात आले होते. आशिमा छिब्बर यांनी दिग्दर्शित केलेला तो चित्रपट सत्य घटनेवर आधारित होता. आता सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राणी तिच्या मर्दानी ३ मध्ये व्यस्त असल्याचे सांगण्यात आले आहे. त्याचे दिग्दर्शन गोपी पुथरन हे करणार आहे. राणीच्या मर्दानी ३ च्या चित्रिकरणाला पुढील वर्षी सुरुवात होणार आहे. राणीच्या वैयक्तिक आयुष्याविषयी सांगायचे झाल्यास तिनं निर्माता आदित्य चोप्रा यांच्याशी लग्न केलं असून तिला एक मुलगी आहे. तिचे नाव आदिरा असे आहे. काही मुलाखतींमधून राणीनं आपल्या कुटूंबाविषयी केलेलं भाष्य चर्चेत आलं होतं.



# टीम इंडियाने बदला घेतला!

## टी-20 मालिका जिंकत जागतिक पराक्रमही केला नावावर!

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**टीम इंडियाने वर्ल्डकप फायनलमधील पराभवाचा बदला ऑस्ट्रेलियावर मोठा विजय मिळवला. मायदेशातील पाच सामन्यांच्या टी-20 मालिका 3-1 ने जिंकली आहे. यासह जागतिक क्रिकेटमध्ये सर्वाधिक टी-20 विजय मिळवण्याचा पराक्रम करत पाकिस्तानला मागे टाकले आहे. टीम इंडियाने रायपूर टी-20मध्ये ऑस्ट्रेलियाचा 20 धावांनी पराभव करत पाच सामन्यांची टी-20 मालिका जिंकली.**

टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना 9 गडी गमावून 174 धावा केल्या, प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियन संघ निर्धारित 20 षटकात केवळ 154 धावाच करू शकला. रिंकू सिंह आणि जितेश शर्मा यांनी टीम इंडियाच्या फलंदाजीत आपली ताकद दाखवली. अक्षर पटेलच्या फिरकीने गोलंदाजीने धमाका करत तीन विकेट घेतल्या. भारतीय संघाने आता या T20 मालिकेत 3-1 अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियन कर्णधार मॅथ्यू वेडने नाणेफेक जिंकून टीम इंडियाला फलंदाजीला दिले. येथे भारतीय सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी 50 धावा जोडल्या.

या एकूण धावसंख्येवर यशस्वी (37) बाद झाला आणि त्यानंतर टीम इंडियाने श्रेयस अय्यर (8) आणि कर्णधार सूर्यकुमार यादव (1) यांची झटपट विकेटही गमावली. टीम इंडियाने 63 धावांत तीन विकेट गमावल्या होत्या. येथून रिंकू सिंहसह ऋतुराज गायकवाडने डावाची धुरा सांभाळली. गायकवाडही ३२ धावा करून बाद झाला तेव्हा रिंकू आणि जितेश शर्मा यांनी डाव पुढे नेला. दोघांनी 32 चेंडूत 56 धावांची जलद



भागीदारी केली. रिंकू आणि जितेश जेव्हा क्रीझवर होते तेव्हा टीम इंडिया आज पुन्हा एकदा 200 पार करेल असं वाटत होतं. पण इथे जितेश 19 चेंडूत 35 धावा करून बाद झाला. ही भागीदारी तुटल्यानंतर ऑस्ट्रेलियन गोलंदाजांकडून तुफान खेळी झाली आणि शेवटच्या ५ विकेट अवघ्या 7 धावांत पडल्या. अक्षर पटेल (0), रिंकू सिंग (46), दीपक चहर (0) आणि रवी बिश्नोई (1) पॅव्हेलियनमध्ये परतले. अशाप्रकारे भारतीय संघाला निर्धारित 20 षटकात 9 गडी गमावून केवळ 174 धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून बेन द्वारशियसने 4 षटकात 40 धावा देत 3 बळी घेतले. बेहरेनडॉर्फ आणि तनवीर संघालाही २-२ बळी मिळाले. ॲरॉन हार्डीनेही एक विकेट घेतली. दुसरीकडे, पाकिस्तानने टी-20 आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या इतिहासात आतापर्यंत सर्वाधिक सामने जिंकले आहेत. पाकिस्तान क्रिकेट संघाने आतापर्यंत एकूण 226 टी-20 सामने खेळले असून त्यापैकी 135 सामने त्यांनी जिंकले आहेत. त्याचबरोबर भारताने सध्याच्या मालिकेतील दुसऱ्या टी 20 सामन्यात ऑस्ट्रेलियाला पराभूत करून T20 इतिहासातील 136 वा विजय देखील मिळवला. भारतीय क्रिकेट संघाने 135 टी-20 सामने जिंकण्यासाठी पाकिस्तानपेक्षा खूपच कमी वेळ घेतला आहे. पाकिस्तानने इतके सामने जिंकण्यासाठी 226 टी-20 सामने खेळले होते, तर भारताने केवळ 209 टी-20 सामन्यांमध्ये इतके सामने जिंकले. भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया टी२० मालिकेतील चौथा सामना रायपूरच्या शहिद वीर नारायण सिंग स्टेडियमवर खेळवला जात आहे. या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर २० धावांनी विजय मिळवला. रिंकू सिंगची ४६ धावांची खेळी आणि अक्षर पटेलने पटकावलेल्या ३ विकेट्सच्या जोरावर भारताने हा विजय खेचून आणला. या विजयासह भारताने मालिका विजयही निश्चित केला आहे.

### ऑस्ट्रेलियासमोर 175 धावांचे आव्हान

» ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताने रिंकू सिंग आणि जितेश शर्माच्या फटकेबाजीच्या जोरावर १७४ धावा केल्या असून ऑस्ट्रेलियासमोर १७५ धावांचे आव्हान ठेवले होते. भारताच्या १७५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला १५४ धावाच करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून मॅथ्यू हेडने २३ चेंडूमध्ये ३६ धावा, ट्रायव्हस हेड १६ चेंडूमध्ये ३१ धावा आणि मॅथ्यू वॅटने १९ चेंडूमध्ये २२ धावांचे योगदान दिले. भारताकडून अक्षर पटेलने ३, दीपक चहरने २ तर रवी बिश्नोई आणि आवेश खानने प्रत्येकी १ विकेट पटकावली.

# आयपीएल लिलावासाठी 1166 खेळाडूंची नोंदणी!

## 830 भारतीय खेळाडूंनी नोंदणी; 18 भारतीय खेळाडू कॅप्ड

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंडियन प्रीमियर लीग 2024 साठी मिनी लिलाव 19 डिसेंबर 2023 रोजी दुबईत होणार आहे. दरम्यान, लिलावासाठी एकदिवसीय विश्वचषक 2023 मध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या बड्या स्टार्सनी आपल्या नावांची नोंदणी केली आहे. यामध्ये मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स, ट्रॅव्हिस हेड, डॅरिल मिशेल आणि रचिन रवींद्र यांसारख्या मोठ्या खेळाडूंचा समावेश आहे.**

लिलावासाठी नोंदणी केलेल्या 1,166 खेळाडूंपैकी 830 भारतीय खेळाडू आहेत, तर 336 परदेशी खेळाडू आहेत. उल्लेखनीय म्हणजे, या यादीत 212 कॅप्ड खेळाडूंनी नोंदणी केली आहे, तर 909 खेळाडू अनकॅप्ड आहेत. याशिवाय 45 सहयोगी खेळाडूंनी लीगमध्ये नशीब




आजमावण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई इंडियन्स (MI) द्वारे रिलीज केलेल्या इंग्लंडच्या वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने आपल्या नावाची नोंदणी केलेली नाही. 830 भारतीयांपैकी 18 कॅप्ड खेळाडू आहेत. या खेळाडूंमध्ये वरुण आरोन, केएस भरत, केदार जाधव, सिद्धार्थ कौल, धवल कुलकर्णी, शिवम मावी, शाहबाज नदीम, करुण नायर, मनीष पांडे, हर्षल पटेल, चेतन साकारिया, मनदीप सिंग, बरिंदर सरन यांचा समावेश आहे. याशिवाय शार्दुल ठाकूर, जयदेव उनाडकट, हनुमा विहारी, संदीप वारियर आणि उमेश यादव हे देखील लिलावात उतरतील. कॅप्ड भारतीय खेळाडूंपैकी हर्षल, जाधव, शार्दुल आणि उमेश यांना त्यांच्या फ्रँचायझींनी अलीकडेच रिलीज केले आहे. या चौघांची मूळ किंत 2 कोटी ठेवली आहे. आदिल रशीद, हॅरी ब्रूक आणि डेविड मलान यांच्यासह अनेक इंग्लिश खेळाडूंनी लिलावासाठी आपल्या नावाची नोंदणी केली आहे. रेहान अहमद (50 लाख), गुस ऍटकिन्सन (1 कोटी), टॉम बँटन (2 कोटी), सॅम बिलिंग्स (1 कोटी), हॅरी ब्रूक (2 कोटी), ब्रायडन कार्स (50 लाख रुपये), टॉम कुरन (1.5 कोटी), बेन डकेट (2 कोटी), जॉर्ज गार्टन (50 लाख), रिचर्ड ग्लीसन (50 लाख), सॅम्युअल हेन (50 लाख), ख्रिस जॉर्डन (1.5 कोटी), डेविड मालन (1.5 कोटी), टायमल मिल्स (1.5 कोटी), जेमी ओव्हरटन (2 कोटी), ऑली पोप (50 लाख), आदिल रशीद (2 कोटी), फिलिप सॉल्ट (1.5 कोटी), जॉर्ज स्क्रिमशॉ (50 लाख), ऑली स्टोन (75 लाख), डेव्हिड विली (2 कोटी), ख्रिस वोक्स (2 कोटी), ल्यूक वुड (50 लाख) आणि मार्क एडेयर (50 लाख) यांचाही या यादीत समावेश आहे. लिलावासाठी नोंदणी केलेल्या 1,166 खेळाडूंपैकी 830 भारतीय खेळाडू आहेत, तर 336 परदेशी खेळाडू आहेत. उल्लेखनीय म्हणजे, या यादीत 212 कॅप्ड खेळाडूंनी नोंदणी केली आहे, तर 909 खेळाडू अनकॅप्ड आहेत. याशिवाय 45 सहयोगी खेळाडूंनी लीगमध्ये नशीब आजमावण्याचा निर्णय घेतला आहे.

### 830 भारतीय खेळाडूंनी नोंदणी

» मुंबई इंडियन्स (MI) द्वारे रिलीज केलेल्या इंग्लंडच्या वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने आपल्या नावाची नोंदणी केलेली नाही. 830 भारतीयांपैकी 18 कॅप्ड खेळाडू आहेत. याशिवाय शार्दुल ठाकूर, जयदेव उनाडकट, हनुमा विहारी, संदीप वारियर आणि उमेश यादव हे देखील लिलावात उतरतील. कॅप्ड भारतीय खेळाडूंपैकी हर्षल, जाधव, शार्दुल आणि उमेश यांना त्यांच्या फ्रँचायझींनी अलीकडेच रिलीज केले आहे. या चौघांची मूळ किंत 2 कोटी ठेवली आहे. 830 भारतीयांपैकी 18 कॅप्ड खेळाडू आहेत. याशिवाय शार्दुल ठाकूर, जयदेव उनाडकट, हनुमा विहारी, संदीप वारियर आणि उमेश यादव हे देखील लिलावात उतरतील.